# दक्षिण महाराष्ट्रातील निवडक जैन व्यक्तिमत्वांचा ऐतिहासिक आढावा.

**श्री. सुरज विजय चौगुले***
शोध विद्यार्थी,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. एस.आर. कट्टीमनी ****
संशोधक गाईड,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**घोषवारा:**

दक्षिण महाराष्ट्र हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध असा प्रदेश आहे. या भूभागाला जैन धर्माचा हजारो वर्षांचा वैभवशाली वारसा लाभलेला आहे. जैन धर्म हा भारतातील एक प्राचीन धर्म असून, तो लोकशाही मूल्यांवर आधारित समता, अहिंसा आणि सहिष्णुतेचा पुरस्कार करतो. महाराष्ट्रातील जैन समाज केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक क्षेत्रांतही अग्रगण्य राहिला आहे. विशेषतः कोल्हापूर, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये जैन समाजाने समाजाच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावली आहे.

महाराष्ट्रातील जैन समाजाची ओळख केवळ 'गुजराती-मारवाडी व्यापारी' अशी मर्यादित न ठेवता, तो मराठी भाषिक, स्थानिक आणि दिगंबर परंपरेचा वारसा जपणारा एक महत्त्वाचा समाज घटक म्हणूनही ओळखला जातो. चतुर्थ, पंचम, सैतवाल, कासार अशा विविध जातीय घटकांमधून जैन समाजाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. जैन कासार समाज, सैतवाल समाज, पंचम समाज, तसेच श्वेतांबर आणि दिगंबर परंपरेतील विविध संघटना, संस्था आणि व्यक्तिमत्त्वे यांनी समाजाच्या संघटन, धर्मप्रसार, शिक्षण, आरोग्य, उद्योग, कला, साहित्य आणि सामाजिक सुधारणांमध्ये मोठे योगदान दिले आहे.

**संज्ञा पारिभाषिक शब्द:** दक्षिण महाराष्ट्र, लोकशाही, अहिंसा, सहिष्णुता, श्वेतांबर, दिगंबर

**प्रस्तावना:**

दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाच्या इतिहासाचा मागोवा घेतल्यास, प्राचीन काळापासून या समाजाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर आपला ठसा उमटवला आहे. प्राचीन मराठी भाषेतील पहिले शिलालेख, साहित्यनिर्मिती, स्थापत्यकला, भव्य मंदिरे, गुंफा, पाणी व्यवस्थापनाची सोय, शिक्षणसंस्था, धर्मशाळा, तसेच विविध सामाजिक उपक्रम यामध्ये जैन समाजाचा मोठा वाटा आहे. जैन कासार समाज, पंचम समाज, सैतवाल समाज आणि इतर घटकांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत आपली सामाजिक बांधिलकी सातत्याने जपली आहे. 'जैन कासार समाज संस्था', 'दक्षिण भारत जैन सभा', 'जैन कासार समाचार' मासिक, विविध धर्मशाळा, शैक्षणिक संस्था, महिला संघटना, युवक मंडळे, तसेच अनेक सेवाभावी संस्था यांद्वारे समाजाने संघटितपणे कार्य केले आहे.

या भागातील जैन व्यक्तिमत्त्वांनी केवळ धर्मप्रसारच नव्हे, तर समाजसुधारणा, स्त्री-उन्नती (स्त्री-उद्धार), शिक्षण, आरोग्य, उद्योग, साहित्य, कला, पर्यावरण संरक्षण आणि दानधर्म अशा विविध क्षेत्रांत आपला अमूल्य ठसा उमटवला आहे. अनेक जैन साधू-साध्वी, मुनी, विद्वान, साहित्यिक, उद्योगपती, समाजसेवक, महिला नेत्या आणि तरुण कार्यकर्ते यांनी समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. थोडक्यात, दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाचा हा प्रवास म्हणजे परंपरा आणि आधुनिकता, धर्म आणि समाजकारण, स्थानिकता आणि जागतिकता यांचा एक सुंदर संगम आहे. प्रस्तुत शोध निबंधातून आपण या भागातील जैन व्यक्तिमत्त्वे आणि संस्थांच्या योगदानाचा सर्वांगीण आढावा घेणार आहोत.

**१. हुतात्मा मोतीचंद :**

मोतीचंद यांचा जन्म १८९० साली सोलापूर जिल्ह्यातील करकंब येथे झाला. त्यांना बालपणापासूनच धार्मिक व देशभक्तीचे संस्कार मिळाले. शारीरिक आणि बौद्धिक शिक्षण घेत असतानाच त्यांनी सावरकरांचे जोसेफ मॅझिनी, योगी अरविंदांचे वंदे मातरम् यांसारखी प्रेरणादायक पुस्तके वाचून देशभक्तीची प्रेरणा घेतली. सोलापुरातील देवचंद कस्तुरचंद (नंतरचे मुनिश्री संमतभद्र महाराज) यांच्याशी मैत्री होऊन दोघांनी १९०६ साली 'जैन बालोत्तेजक समाज' या संघटनेची स्थापना केली, ज्याचे उद्घाटन लोकमान्य टिळकांनी केले. मोतीचंदांनी टिळकांच्या राष्ट्रीय विद्यालय स्थापनेसाठी निधी संकलनात मदत केली. पुढे त्यांनी सशस्त्र क्रांतीत भाग घेतला. "राजस्थानमधील निमच गावातील मठाधीशाच्या संपत्तीचा वापर क्रांतीसाठी करण्याचा कट रचण्यात आला, ज्यात मोतीचंद सहभागी होते; या कारवाईनंतर ब्रिटिशांनी शोधमोहीम राबवली, आणि महेंद्रकुमार नाटक प्रकरणाच्या माध्यमातून मोतीचंदांसह अन्य क्रांतीकारकांना अटक झाली. त्यांना खुनासाठी फाशीची शिक्षा झाली."[१] तुरुंगातील त्यांचे आचरण शांत, उदात्त व साधुपणाला साजेसे होते. देशभक्तीबरोबरच त्यांची जैन धर्मनिष्ठाही ठळक होती. मोतीचंद हे एक महान जैन क्रांतीकारक होते ज्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अतुलनीय आहे.

**२. आण्णासाहेब लट्ठे:**

जैन समाजातील थोर नेते आण्णासाहेब बाबाजी लट्ठे यांचा जन्म ९ डिसेंबर १८७८ रोजी कुरूंदवाड येथे झाला. त्यांनी १८९५ मध्ये मॅट्रीक व १९०१ डेक्कन कॉलेजमधून मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी मिळवली. १९०३ मध्ये उच्च श्रेणीतून एम. ए. पदवी उत्तीर्ण झाले. त्या काळामध्ये एम. ए. होणारे आण्णासाहेब लट्ठे हे जैन समाजातील पहिलेच विद्यार्थी होते. "१८९९ मध्ये वयाच्या एकविसाव्या वर्षी दक्षिण महाराष्ट्र जैन सभा स्थापन करण्यात त्यांचा पुढाकार होता; 'जिनविजय' या मासिकाचे संपादकत्वही सुरवातीच्या काळात त्यांच्याकडे होते."[२]

जैन समाजातील प्रतिष्ठीत जैन व्यक्तींमार्फत त्यांचा कोल्हापूरच्या राजर्षी शाहू छत्रपतींशी निकटचा संपर्क आला. १९११ मध्ये लट्ठेची कोल्हापूर संस्थानाचे विद्याधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. १९१५ मध्ये त्यांनी डेक्कन ब्राह्मणेतर सभेची बेळगावमध्ये स्थापना केली. १९१६ साली पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एल. एल. बी. झाले. "त्यांनी १९१८ मध्ये 'डेक्कन रयत' हे इंग्रजी साप्ताहिक सुरु केले."[३]

१९२१ ते १९२९ या कालावधीत ते कोल्हापूर संस्थानाच्या विधीमंडळाचे सदस्य होते. १९२४ मध्ये त्यांनी ब्राह्मणेतर काँग्रेसचे अधिवेशन भरविले. "१९२७ साली आण्णासाहेब लट्ठे आणि गांधीजी यांची भेट झाली; १९३० मध्ये संस्थानिकांच्या मार्फत बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला गोलमेज परिषदेसाठी गेले."[४]

आण्णासाहेब लट्ठे हे ब्रिटीश सरकारने दिलेल्या सर्व पदव्यांचा त्याग करून काँग्रेस पक्षात आले होते. त्या काळात काँग्रेस पक्ष म्हणजे स्वातंत्र्यासाठी लढणारा पक्ष अशी भूमिका असल्याने लट्ठेनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. "आण्णासाहेव लट्ठेनी स्वातंत्र्यचळवळीत सामान्य स्वातंत्र्यसैनिकाने ज्याप्रमाणे लढा दिला त्याप्रमाणे लढा दिला नसला तरीही संस्थाची राज्ययंत्रणा कार्यक्षमपणे पाहणे, राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी जनजागृती करणे यासारखे स्वातंत्र्यचळवळीला पोषक असे कार्य त्यांनी केले."[५]

**३. हुतात्मा आण्णासाहेब पत्रावळे :**

आण्णासाहेब व्यंकाप्पा पत्रावळे यांचा जन्म १९२५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथे झाला. १९३८ मध्ये आण्णा सातवी पास झाले होते. शालेय जीवनात हुशार असल्याने त्यांना स्कॉलरशिपही मिळाली होती. लहानपणातच त्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी करावे असे त्यांना वाटू लागले. घरची परिस्थिती चांगली असतांनाही गोरगरिबांना चांगले अन्न खावयास मिळत नाही असे वाटून आण्णा हे साधेच जेवण घेत असत. लहानपणी राष्ट्रीय पुढाऱ्यांची स्फूर्तीदायी चरित्रे व महात्मा

गांधी यांचे हरिजन वृत्तपत्रातील लेख वाचल्यामुळे ते स्वातंत्र्य मिळविण्याच्या भावनेने प्रेरित झाले होते. "१९४२ मध्ये वार्षिक परीक्षा आण्णांनी चांगली दिली पण प्रत्येक उत्तरपत्रिकेत 'गुरुजनहो, नोकरी सोडा, देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतीकार्यात भाग घ्या,' असे लिहून ठेवले."[६]

आण्णाच्या वयाच्या अठराव्या व सांगली स्टेशनच्या चौकात स्वातंत्र्यचळवळीच्या प्रचारार्थ सभा चालू होती. या सभेवर पोलीसांनी गोळीबार केला. त्यात अनेक लोक जखमी, घायाळ झाले होते. या लोकांना दवाखान्यात नेण्यासाठी आण्णा हे हिमतीने पुढे गेले. त्याचा पोलीसांना राग आला होता. त्यांनी आण्णांच्या कारवायावर बारकाईने लक्ष ठेवून सांगलीच्या बुरुड गल्लीत बैठक चालू असताना अचानक छापा टाकला, आण्णा पत्रावळेना अटक करून सांगलीच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. जेलमध्ये आण्णाबरोबर वसंतदादा ही होते. एके दिवशी जेलमध्ये बंद असणाऱ्या सर्व क्रातीकारकांनी तुरुंग फोडून बाहेर पळ काढला पोलीस सर्व क्रांतीकारकांच्या मार्गावर होते. पोलीसांनी क्रांतीकारकांवर गोळ्या झाडल्या. त्यातलीच एक गोळी आण्णांना लागून ते स्वातंत्र्यासाठी हुतात्मे झाले. आजही सांगलीमध्ये आण्णासाहेबांच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याची आठवण ठेवण्यासाठी तेथे 'हुतात्मा आण्णासाहेब पत्रावळे चौक' उभारला आहे.

**४. भूपाल अणस्कुरे :**

भूषाल अणस्कुरे यांचा जन्म १९२७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ठिकपुर्लीं, ता. राधानगरी या गावी झाला. त्यांचे शिक्षण सहावीपर्यंत झाले. वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षापासून किराणा दुकान चालवून घरच्या परिस्थितीस हातभार लावला. व्यापाराच्या निमित्ताने सांगलीला येणे-जाणे होत असतांना त्यांची स्वातंत्र्यसैनिक पी. बी. पाटील यांच्याशी भेट झाली. त्यांच्या परिचयाने भूपाल अणस्कुरे यांची स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेण्याची इच्छा वाढू लागली. त्यांच्या स्वातंत्र्यचळवळीच्या ओढीने त्यांनी लग्न न करता स्वातंत्र्यात सहभाग घेणे अधिक पसंत केले. "भूपाल यांनी १९४२ ची 'भारत छोडो' चळवळ चालू असतांना भूमिगत राहून या चळवळीत कार्य करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या जेवणाची व औषधपाण्याची ते व्यवस्था पाहत; तसेच ते क्रांतीकारकांना बंदुका, बाँब, डायनामाईट या वस्तूही पुरवत."[७]

भूमिगतांना भूपाल यांनी मदत केल्याने ब्रिटीश सरकारने त्यांना अटक केली. तुरुंगात असतांना त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. तुरुंगातून सुटण्यासाठी ब्रिटिशांनी त्यांना माफीचा साक्षीदार होण्यास सांगितले पण त्यामुळे आपल्याच सहकाऱ्यांना ब्रिटीश पकडतील हे लक्षात आल्याने त्यांनी माफीचा साक्षीदार होण्यास नकार दिला. कोल्हापूरचे बापूसाहेब मिरजे यांनी पाच हजार रूपयांच्या जामीनावर भूपाल अणस्कुरे यांची सुटका करून आणली. तुरुंगातील अनन्वित छळामुळे भूपाल यांची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्यांच्यावर मिरजेत उपचार सुरू होते. १९४५ मध्ये ब्रिटीशांनी पुन्हा त्यांच्याविरुद्ध खटला भरला. पण त्याच दिवशी त्याचा स्वर्गवास झाला. ब्रिटीश या स्वातंत्र्यप्रेमी देशभक्ताचे काहीही बिघडवू शकले नाही.

**५. स्वातंत्र्यवीर सातप्पा :**

कोल्हापूर जिल्ह्यातील कडवी शिवापूर या गावी १९१४ मध्ये सातप्पाचा जन्म झाला. सातप्पाचे शिक्षण बेताचेच झाले. गावामध्ये ते शेती करायचे. टिळकयुग संपून गांधीयुगाला सुरुवात झाली होती. १९३० मध्ये गावामध्ये असहकार चळवळीची स्वयंसेवक दले निर्माण झाली होती त्यात त्यांनी सहभाग नोंदविला. या पथकामार्फत त्यांनी आजूबाजूच्या खेड्यामध्ये स्वातंत्र्यप्रेरणा जागृत केली. "१९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात सातप्पांनी दोनवेळा सहभाग घेतला; त्यासाठी त्यांना दोनदा हिंडलगा तुरुंगात जावे लागले होते."[८]

गांधीजींचा ऑगस्टचा क्रांतीसंदेश १२ ऑगस्टला शिवापूरात पोहचला. सातप्पांनी चावडीवर तिरंगा फडकावला व गावात सभा आणि मिरवणूक काढली. १५ ऑगस्टला कडवी शिवापूरमध्ये चाळीसे ते पन्नास बंदूकधारी व दहा-पंधरा लाठीधारी पोलीस

गावात आले. साताप्पाच्या नेतृत्वाखाली निघालेली प्रभातफेरी पोलीसांनी थांबवली. पण सातप्पाचा प्रभातफेरी पूर्ण करण्याचा निधार होता. तेव्हा पोलीसांनी प्रभातफेरीतील लोकावर लाठीमार, गोळीबार करण्यास सुरवात केली. सातप्पानी मध्ये राष्ट्रध्वज घेऊन वंदेमातरमच्या घोषणा दिल्या. सातप्पावर पोलीसानी गोळया झाडल्या. अखेरच्या क्षणापर्यं सातप्पाचा वंदे मातरम् जयघोष सुरू होता. अशा पद्धतीने सातप्पाने देशासाठी विस्मरण पत्करले.

**६. स्वातंत्र्यसैनिक बी. एस. पाटील** :

स्वातंत्र्यसैनिक बी. एस. पाटील यांचा जन्म गडहिंग्लज जवळच्या गिजवणे या गावी १८ एप्रिल, १९२७ मध्ये झाला. त्यांचे पूर्ण नाव बाबूराव सातगोंडा पाटील होते. बी. एस. पाटील यांनी शेतीवर स्वयंस्फूर्तीने काम करत आपले शिक्षण घेतले. त्या काळामध्ये देशासाठी लढणाऱ्या माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव मुद्राळे, पी. बी. पाटील यांचा आदर्श बी. एस. पाटील यांच्या समोर होता. शालेय जीवनातच बी. एस. पाटलांनी खादी वापरायला सुरू करून स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. ८ ऑगस्ट १९४२ मध्ये गांधीजींनी मुंबईच्या गवालिया टंक मैदानावर 'चले जाव'ची हाक देऊन इंग्रजांना भारत सोडून जाण्यास सांगितले. याची माहिती मिळताच १० ऑगस्टला गडहिंग्लजला आल्यानंतर बी. एस. पाटील यांना शाळेतील मित्रांना एकत्र करून गावात भव्य मिरवणूक काढली.

या मिरवणूकीनंतर झालेल्या सभेत बी. एस. पाटील यांनी देशभक्तीने ओथबलेले प्रभावी भाषण केले. बी. एस. पाटील व त्यांच्या समविचारी मित्रांच्या मनात जहाल क्रांतीचे विचार येऊ लागले. बी. एस. पाटील यांच्या पुढाकाराने 'नवजीवन पक्षाची' स्थापना करण्यात आली. या पक्षाने भूमिगत राहून ब्रिटीशांना सळो की पळो करण्याचे धोरण स्वीकारले. त्याचाच एक भाग म्हणून बी. एस. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी गारगोटी येथील सरकारी कचेरीवर हल्ला करण्याचे निश्चित केले. १३ ऑगस्ट १९४२ मध्ये गारगोटी येथील कचेरीवर हल्ला करण्याचे ठरविण्यात आले. पण तत्पूर्वीच काही क्रांतीकारकांनी कचेरीवर हल्ला केला. पोलीसांच्या गोळीबारात सात क्रांतीकारक मारले गेले. या हल्ल्यासाठी बी. एस. पाटील यांनी क्रांतीकारकांना शस्त्रे पुरविली अशी माहिती पोलीसांना मिळाल्याने त्यांना अटक करण्यासाठी पोलीस त्यांचा शोध घेऊ लागले. बी. एस. पाटील या काळात भूमिगत होऊन कार्य करू लागले. "कोल्हापूरात गावठी बाँबचे प्रयोग करण्यासाठी बी. एस. पाटील येणार असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्याने बेळगावहून कोल्हापूरला आलेल्या बी. एस. पाटील यांना अटक करण्यात आली."[१]

तुरुंगात त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. स्वातंत्र्य चळवळीचा जोर वाढू लागला होता. गांधीजींनी ब्रिटीशांबरोबर वाटाघाटी करून १९४७ पूर्वी सर्व राजकैद्यांना सोडले पाहिजे, अशी अट घाली. त्यामुळे क्रांतीकारकांची ब्रिटीशांनी जेलमधून सुटका केली. त्यात बी. एस. पाटील यांचाही सहभाग होता.

**७. माणिकचंद बंडूचंद दोशी :**

माणिकचंद यांचा जन्म बंडूचंद व हुलजबाई यांच्या पोटी २८ फेब्रुवारी १९०८ मध्ये झाला. बालवयात त्यांच्यावर जैनधर्माचे व शिवचरित्राचे संस्कार झाले. शिक्षणासाठी सोलापूर येथे आले असतांना रामकृष्ण जाजू, डॉ. आंगोळीकर या देशभक्तांशी त्यांचा संबंध आला. "मुळशीचा सत्याग्रह, जालियनवाला बाग हत्याकांड, महात्मा गांधीचा बहिष्कार कार्यक्रम आणि ॲनी बेझंट यांची व्याख्याने यामुळे ते राष्ट्रकार्यात दाखल झाले.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांनी खेड्यापाड्यात फिरून जोरदार उठाव घडवून आणला. या मोर्चात सहभागी झालेल्या लोकावर पोलीसानी गोळीबार केला त्यात सहा लोक शहीद झाले. ७ सप्टेंबर १९४२ रोजी सभेला भाषणाद्वारे संबोधीत करत असतांना पोलीसांनी माणिकचंद यांना अटक केली. त्याच्या अटकेमुळे लोकक्षोभ झाला. ठिकठिकाणी अटकेच्या निषेधार्थ हडताळ पाळण्यात आले. सरकारने माणिकचंदाना सातारा येथे एक वर्ष सश्रम कारावास आणि ५० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

तुरुंगामध्ये माणिकचंदानी १२५ ग्रंथ वाचले. रत्नककरंड, श्रावकाचार, गीताई, दि कॅपिटल हे ग्रंथही वाचले. "१९४३ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर त्यांनी गावोगावी जाऊन राष्ट्रीय सेवादलाचे जाळे विणले; शांततामय सहजीवनासाठी माणिकचंदांनी शांतीसेना शिबिरे घेऊन जनशक्ती संघटीत केली, त्यांच्या कार्यामुळे माणिकचंदांना 'संतश्री' व 'छोटे गांधीजी' ही उपाधी मिळाली."[१०]

**८. देशभक्त बाबासाहेब खंजिरे :**

यांचा जन्म १९२० मध्ये झाला. यांनी विद्यार्थी दशेपासूनच स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. चलेजाव आंदोलनानंतर सरकारी कार्यालयावर हल्ले करण्यास त्यांनी प्रारंभ केला. अनेक रेल्वे स्टेशन जाळून उद्ध्वस्त केली. यामध्ये चंदूर येथील क्रांती सैनिकांनी पुढाकार घेतला होता. या गटाचे नेतृत्व शंकरराव पाटील यांच्याकडे होते. त्यामध्ये कर्नाटकातील काही स्वातंत्र्यसैनिक सामिल झाले होते. त्यांनी हातकणगले स्टेशन उद्ध्वस्त करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये बाबासाहेब खंजिरे यांचा पुढाकार महत्त्वाचा ठरला. या. स्टेशनच्या संरक्षणासाठी आठ पहारेकरी होते. त्यांना एका गटाने रोखून धरले. काहींनी स्टेशन मास्तरला ताब्यात घेतले, भल्या मोठ्या हातोड्याने घण घालून टेलिग्राफ यंत्र फोडले आणि बरोबर आणलेल्या पत्नास डब्यातील रॉकेल शिपडून स्टेशन इमारतीला आग लावली. सर्वत्र अफवा उठली की, पाचशे लोकांच्या तुकडीने स्टेशन जाळले. या घटनेतील सहभागींची नावे पोलीसांनी शोधली. सहा महिने खटला चालला. त्यात २९ आरोपीपैकी २३ जणांना ५ वर्षांची सत्तमजुरी व ५०० रु. दंड ठोठावण्यात आला. यामध्ये बाबासाहेब खंजिरेचा सहभाग होता. "पुढे स्वातंत्र्य मिळाल्यावर इचलकरंजी व सभोवतालची गावे महाराष्ट्रात यावी म्हणून देशभक्त बाबासाहेब खंजिरेंनी मौलिक कार्य केले."[११] ते आमदार असल्याने त्यांचे म्हणणे मान्य करावे लागले. तसेच इचलकरंजी नगरीचा कायापालट घडवून आणण्यासाठी त्यांनी सहकारी चळवळीचा मार्ग स्वीकारला.

**९. दादा अप्पाजी बर्डे:**

दादा अप्पाजी बर्डे यांनी स्वातंत्र्यचळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले. संपूर्ण महाराष्ट्राला 'बर्डे मास्तर' म्हणून परिचित होते. त्यांचा जन्म ३ ऑगस्ट, १९०८ मध्ये इस्लामपूर येथे झाला. सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. ४ एप्रिल १९३० मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झाले. २८ मे १९३० रोजी धरासना येथे बर्डे गुरुजी आणि त्यांचे ६५ सहकारी गेले असता ब्रिटिशांनी त्यांना सत्याग्रह थांबवण्याबाबत सांगितलं. त्यावेळी बर्डे गुरुजींनी त्यांना बाणेदार उत्तर दिल 'आम्ही थांबण्यासाठी आलेलो नाही तर मीठ नेण्यासाठी आलो आहोत'. राष्ट्रीय काँग्रेसची सभासद संख्या वाढविणे, ग्रामोद्योग, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण इत्यादी कार्य अव्याहतपणे केले. 'चले जाव' आंदोलनातही त्यांनी सक्रीय भूमिका घेतली. "'राष्ट्रसेवा दल' या प्रतिसरकारमधील संस्थेतही त्यांनी तरुणांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य केले."[१२]

**निष्कर्ष:**

दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाचा इतिहास, त्यातील व्यक्तिमत्त्वांचे कार्य आणि संस्थांचे योगदान हे केवळ या प्रदेशापुरते मर्यादित नसून, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनावरही आपला ठसा उमटवणारे आहे. या प्रकरणाचा सखोल अभ्यास केल्यानंतर हे स्पष्टपणे लक्षात येते की, जैन समाजाने आपल्या मूल्यांवर, परंपरांवर आणि आधुनिकतेच्या स्वीकारावर आधारलेली समाजसेवा, शिक्षण, उद्योग, साहित्य, कला, पर्यावरण, आरोग्य आणि स्त्री-उन्नती अशा विविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजावली आहे.

जैन धर्माच्या अहिंसा, अपरिग्रह, सत्य आणि समता या तत्त्वांचा प्रभाव जैन समाजाच्या प्रत्येक कृतीत दिसून येतो. दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाने या तत्त्वांचा अवलंब करत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. जैन

समाजाच्या विविध घटकांनी – कासार, सैतवाल, पंचम, श्वेतांबर, दिगंबर – आपापल्या परंपरेनुसार सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

शेवटी, दक्षिण महाराष्ट्रातील जैन समाजाचा प्रवास हा परंपरा आणि आधुनिकता, धर्म आणि समाजकारण, स्थानिकता आणि जागतिकता यांचा एक सुंदर संगम आहे. या समाजाने आपल्या कर्तृत्वातून महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीला एक नवी दिशा दिली आहे. भविष्यातही जैन समाजाच्या मूल्यांचा, कार्याचा आणि संस्थांच्या योगदानाचा आदर्श समाजातील इतर घटकांसाठी प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही. अशा प्रकारे, दक्षिण महाराष्ट्रातील जैन व्यक्तिमत्त्वे व संस्थांचे योगदान हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या योगदानाचा अभ्यास केल्याने समाजसेवा, नेतृत्व, धर्म, शिक्षण, उद्योग आणि आधुनिकतेचा संगम कसा साधावा, हे शिकायला मिळते.

**संदर्भसाधने:**

१. "हुतात्मा मोतीचंद." प्रगति जिनविजय, अंक ९, शनिवार, २० मे १९५०.

२. देशपांडे, र. स. (१९९७), शिलालेखाच्या डोळ्यांतून महाराष्ट्र, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ३४.

३. मेहता हरिशचंद्र (२००४), जैन धर्माचा इतिहास, भारत जैन ग्रंथमाला, मुंबई, पृष्ठ क्र. ८४

४. "आण्णासाहेब लट्ठे." प्रगति आणि जिनविजय, अंक २३, सोमवार, २८ ऑगस्ट १९५०.

५. प्रगति आणि जिनविजय अंक २३ वा सोमवार २८ ऑगस्ट १९५०

६. मगदूम डी. डी., भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील जैनांचे योगदान, शरयू दफ्तरी प्रकाशिका, पृष्ठ क्र. ५८.

७. महाराष्ट्राचा स्वातंत्र्य संग्राम -भूपाळ अणस्कुरे, महाराष्ट्र राज्य ग्रंथसंग्रह विभाग, सरकारी मुद्रणालय, मुंबई, १९७७, पृष्ठ क्र.२४५

८. https://www.maharashtraculture.gov.in/freedomfighters/satyappa

९. 'Freedom Fighter Baburao Satgonda Patil,' Maharashtra Cultural Affairs Department, accessed January 15, 2023,

https://www.maharashtraculture.gov.in/freedomfighters/bspatil.

१०.माणिकचंद बंडूचंद दोशी, सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक, संपादक - महाराष्ट्र राज्य संग्रहालय, डायमंड प्रकाशन, पुणे, १९९१, पृष्ठ क्र. ७८.

११.'बाबासाहेब खंजिरे,' शिव-वाणी: अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना ध्वनी-मालिका, खंड २२४, राजमती पाटील-बिरनाळे , महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००५, पृष्ठ क्र. ४५.

१२.स्वातंत्र्यसैनिक दादा अप्पाजी बर्डे, भारत सरकार संस्कृती मंत्रालय, अंतिम सुधारित १५ मार्च २०२२, https://www.indiaculture.nic.in/freedom-fighters/dada-appaji-barde.